पुढारी

# महाविद्यालयांना फेरप्रवेशासाठी ३१ पर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने महाविद्यालयांना फेरप्रवेशासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाने शैक्षणिक वर्ष २०२०-२२ साठी बी.ए., बी.कॉम. एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र व अर्थशास्त्र), एम.कॉम आणि एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांच्या भाग-१ च्या प्रवेशासाठी २७ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली होती. तथापि, विद्यापीठ, महाविद्यालय कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन व एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे संबंधित विद्यार्थ्यांकडून मुदतवाढीबाबत विचारणा होत होती. विद्यार्थीहित लक्षात घेता सर्व अभ्यासक्रमांसाठी दि. ३१पर्यंत मुदतवाढ दिली आहे. अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्ज याद्या ३ जानेवारीपर्यंत संबंधित परीक्षा विभागात जमा करावयाच्या आहेत.



30 DEC 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोककला टिकवण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : महागाव येथे मध्यवर्ती युवा महोत्सवाचा समारोप

महागाव : वार्ताहर

लोककला व लोकसंस्कृती टिकून राहावी, त्याला चालना मिळावी, यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाईल. विद्यापीठाच्या सुरू असलेल्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना साठ प्रकारच्या वाद्यांचा संच विद्यापीठ उपलब्ध करून देणार आहे. स्पर्धेत थोड्याच गुणांनी अपयश आल्याने खचून जाऊ नका व यश मिळाले म्हणून हुरळून जाऊ नका, असा सल्ला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिला. महागाव (ता. गडहिंग्लज) येथे आयोजित मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष ॲड. डॉ. आण्णासाहेब चव्हाण होते.

प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत यांनी प्रास्ताविक केले. यावेळी यजमान



महागाव : युवा महोत्सवाच्या समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्राचार्य एस. एच. सावंत, राहुल मगदूम, पी. एस. पाटील, अजित नरके, डी. जी. चिघळीकर आदी.

महाविद्यालयाचे प्राचार्य व इतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व विद्यापीठाच्या हीरकमहोत्सव वर्षानिमित्त विद्यापीठ विविध उपक्रम राबवत आहे. यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. विद्यापीठ लवकरच अभिनय क्षेत्रात करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फिल्म अभिनय सर्टिफिकेट या नवीन कोर्सची सुरुवात करत आहे. यासाठी फिल्मसिटीशी सामंजस्य करार करण्याची प्रक्रिया चालू असल्याचे सांगितले.

नवोदित अभिनय कलाकारांनी स्वतःच्या करिअरची सुरुवात नाटकापासून करावी. या क्षेत्रात मिळालेले कोणतेही काम हे संधी म्हणून स्वीकारा. नुसता कलाकार म्हणून न राहता त्याबरोबरच आपला व्यवसायही सुरू ठेवा, तसेच आपल्या प्रगतीसाठी मिळालेला चषक घरात लपवून ठेवण्याचा सल्लाही मालिका अभिनेते 'लागिरं झालं जी'फेम राहुल मगदूम यांनी दिला.

यावेळी संस्थाध्यक्ष ॲड. आण्णासाहेब चव्हाण, विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, गोकुळचे संचालक अजित नरके यांनी मनोगत व्यक्त केले. दरम्यान, संस्थाध्यक्ष ॲड. चव्हाण लिखित शेगाव ते महागाव पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. सकाळच्या सत्रात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा झाला.

कार्यक्रमास डॉ. यशवंत चव्हाण, सचिव ॲड. बाळासाहेब चव्हाण, प्रा. व्ही. एम. पाटील, डॉ. व्ही. वाय. कदम, डॉ. डी. जी. चिघळीकर, डॉ. डी. व्ही. ताम्हणकर, प्राचार्य, शिक्षक उपस्थित होते.

### महाविद्यालयाचे नेटके संयोजन

संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाने युवा महोत्सवाचे नेटके संयोजन केले होते. मुख्य रंगमंचाची आकर्षक रचना, विद्यापीठ कार्यक्षेत्रातून आलेल्या विद्यार्थ्यांची राहणे व भोजनाची सोय उत्तमप्रकारे केली. यासाठी संस्थेचे पदाधिकारी व प्रशासकीय यंत्रणा विविध विभागातील कामकाजावर देखरेख करत महोत्सव सुरळीत पार पडावा यासाठी प्रयत्नशील होती. या महोत्सवात ६८ महाविद्यालयांतून १३३० विद्यार्थी उपस्थित होते. या महोत्सवात ३२ कलाप्रकार सादर करण्यात आले.

30 DEC 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘विवेकानंद’ला सर्वसाधारण विजेतेपद

## मध्यवर्ती युवा महोत्सव : ‘लोककले’त कऱ्हाड, लोकनृत्यात सांगलीची बाजी

**महागाव, ता. २९ :** शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या ४१ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद कोल्हापूरच्या स्वामी विवेकानंद महाविद्यालयाने पटकावले. सलग दोन वर्षे महाविद्यालयाने या चषकावर नाव कोरले आहे. लोककला विभागात कऱ्हाडच्या सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाने, तर लोकनृत्यात सांगलीतील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाने बाजी मारली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस वितरण झाले.



**चिंचेवाडी : मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या जनरल चॅम्पियनशिपचे पारितोषिक डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक.**

चिंचेवाडी (ता. गडहिंग्लज) येथील संत गजानन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या कॅम्पसमध्ये तीन दिवस चाललेल्या युवा महोत्सवाची डॉ. शिर्के यांच्या उपस्थितीत आज सांगता झाली.

समूहाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. डॉ. आण्णासाहेब चव्हाण अध्यक्षस्थानी होते. दरम्यान, या महोत्सवात कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील ६८ महाविद्यालयांचे एक हजार ३३० विद्यार्थी सहभागी झाले होते. एकूण पाच विभागातील ३२ कला प्रकारांत विद्यार्थ्यांनी कला सादर केली. ९४ परीक्षकांनी तयार केलेला निकाल आज जाहीर केला.

या वेळी डॉ. शिर्के यांनी युवा महोत्सवाचे नेटके संयोजन केल्याबद्दल संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कौतुक केले. लोककला व लोकसंस्कृती टिकून राहावी, म्हणून विद्यार्थ्यांना साठ प्रकारातील वाद्यांचा संच विद्यापीठ उपलब्ध करून देणार आहे. प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी लवकरच अभिनय क्षेत्रात करिअर करणाऱ्यांसाठी फिल्म अभिनय सर्टिफिकेट या नवीन कोर्सची सुरुवात करणार असल्याचे सांगितले. अभिनेते राहुल मगदूम यांनी नवोदित कलाकारांनी करिअरची सुरुवात नाटकापासून करण्याचे आवाहन केले. ॲड. आण्णासाहेब चव्हाण, विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, गोकुळ संचालक अजित नरके यांची भाषणे झाली. दरम्यान, संस्थाध्यक्ष ॲड. चव्हाण यांच्या शेगाव ते महागाव पुस्तकाचे प्रकाशन झाले. प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास डॉ. यशवंत चव्हाण, सचिव ॲड. बाळासाहेब चव्हाण, प्रा. व्ही. एम. पाटील, डॉ. व्ही. वाय. कदम, डॉ. डी. जी. चिघळीकर, डॉ. डी. व्ही. ताम्हणकर आदी उपस्थित होते. प्रा. एस. बी. पोवार यांनी आभार मानले.

### विभागनिहाय इतर निकाल

- **नृत्य विभाग :** विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर
- **नाट्य विभाग :** दत्ताजीराव कदम महाविद्यालय, इचलकरंजी
- **संगीत विभाग :** विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर
- **कला विभाग :** दत्ताजीराव कदम इचलकरंजी
- **वाङ्मय विभाग :** न्यू कॉलेज, कोल्हापूर, डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव (विभागून).

सकाळ

# डॉ. भारती वैशंपायन स्मृती ऑनलाईन संमेलन शनिवारपासून

## शिष्य परिवाराचा २१ दिवसांचा सांगीतिक उपक्रम

**कोल्हापूर, ता. २९ :** शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख व प्रसिद्ध शास्त्रीय गायिका डॉ. भारती वैशंपायन यांच्या दुसऱ्या स्मृतिदिनानिमित्त शनिवार (ता. १) पासून ऑनलाईन संगीत महोत्सव रंगणार आहे. शिष्य परिवारातर्फे सलग २१ दिवस हा उपक्रम होणार असल्याची माहिती स्वरअविनाशी संस्थेचे प्रमुख, गायक डॉ. आनंद धर्माधिकारी यांनी आज दिली.

दरम्यान, गायन, वादनाबरोबरच डॉ. वैशंपायन यांच्याविषयीच्या स्मृतींनाही यानिमित्ताने उजाळा मिळणार आहे. २१ जानेवारीपर्यंत रोज रात्री आठला 'आनंद धर्माधिकारी' या यू ट्यूब व 'स्वरअविनाशी' या फेसबुक पेजवरून या कार्यक्रमांचे प्रसारण होणार आहे.

डॉ. धर्माधिकारी यांच्यासह विश्वास सुतार, डॉ. अजित कुलकर्णी, डॉ. अजय केणी, प्रल्हाद जाधव, शिवराज पाटील, मधुसूदन शिखरे, डॉ. भाग्यश्री मुळे, रमा कुलकर्णी, गौतमी चिपळूणकर, स्वाती खेडेकर, गौरी कुलकर्णी यांचा स्वराभिषेक असेल.



**डॉ. भारती वैशंपायन**

गिरिधर कुलकर्णी, डॉ. सचिन कचोटे, कृष्णा माळवदे, डॉ. दीपक दाभाडे यांचे एकल तबलावादन असेल.

बासरीवादक सचिन जगताप, संतूरवादक सोहम जगताप, व्हायोलीनवादक केदार गुळवणी, सतारवादक अजित कुलकर्णी, माला पाथरे, हार्मोनियमवादक अमित साळोखे आदींचे सादरीकरण असेल. त्याशिवाय, इतर शिष्य साथसंगतीबरोबरच आठवणी सांगतील. निशांत गोंधळीचे सूत्रसंचालन असून, कैवल्य पाटील, गुरू ढोले, प्रल्हाद जाधव, स्वप्नील सुतार, महेश सोनुले आदी तांत्रिक सहाय्य करतील.

30 DEC 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




महागाव : येथील मध्यवर्ती युवा महोत्सवाचे समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कुलगुरु डॉ. डी.टी.शिर्के, शेजारी प्राचार्य डॉ. एस. एच.सावंत,डॉ. आर. व्ही. गुरव, ॲड. बाळासाहेब चव्हाण, डॉ. यशवंत चव्हाण, अभिनेता राहूल मगदूम, डॉ. पी. एस. पाटील, अजित नरके, डॉ. डी. जी. चिघळीकर.

# वाद्यांचा संच विद्यापीठ उपलब्ध करुन देणार

## कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के : मध्यवर्ती युवा महोत्सवाचा समारोप : अभिनेते राहुल मगदूमची उपस्थिती

वार्ताहर
महागाव

लोककला व लोकसंस्कृती टिकून राहावी, त्याला चालना मिळावी यासाठी विद्यापीठात सुरु असलेल्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना साठ प्रकारच्या वाद्यांचा संच विद्यापीठ उपलब्ध करून देणार आहे. स्पर्धेत थोड्याच गुणांनी अपयश आल्याने खचून जाऊ नका व यश मिळाले म्हणून हुरळून जाऊ नका. असा सल्ला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी महागाव (ता. गडहिंग्लज ) येथील संत गजानन कॉलेजच्या हसूरवाडी कॅम्पस येथे आयोजित मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या समारोप प्रसंगी विद्यार्थ्यांना दिला. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष ॲड. डॉ. आण्णासाहेब चव्हाण होते.

### संत गजानन महाराज महाविद्यालयाचे नेटके संयोजन

संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाने युवामहोत्सवाचे नेटके संयोजन केले होते. मुख्य रंगमंचाचे आकर्षक रचना विद्यापीठ कार्यक्षेत्रातून आलेल्या विद्यार्थ्यांची राहणे व भोजनाची सोय उत्तमप्रकारे केली. यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी व प्रशासकीय यंत्रणा विविध विभागातील कामकाजावर देखरेख करीत महोत्सव सुरळीत पार पडावा, यासाठी प्रयत्नशील होते. या महोत्सवात ६८ महाविद्यालयातून १३३० विद्यार्थी उपस्थित व ३२ कलाप्रकार सादर करण्यात आला.

प्रस्ताविक प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत यांनी केले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व विद्यापीठाच्या हिरकमहोत्सव वर्षानिमित्त विद्यापीठ विविध उपक्रम राबवत आहे. विद्यापीठ लवकरच फिल्म अभिनय सर्टिफिकेट अभ्यासक्रमाची सुरुवात करीत आहे. यासाठी फिल्मसिटीशी सामंजस्य करार करण्याची प्रक्रिया चालू असल्याचे सांगितले.

'लागिरं झाल जी' फेम अभिनेते राहुल मगदूम म्हणाले, नवोदित अभिनय कलाकारानी स्वतःच्या करियरची सुरूवात ही नाटकापासून करावी. या क्षेत्रात मिळालेले कोणतेही काम हे संधी म्हणून स्वीकारा. नुसते कलाकार म्हणून न राहता त्याबरोबरच आपला व्यवसायही सुरू ठेवण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

यावेळी संस्थाध्यक्ष ॲड. आण्णासाहेब चव्हाण, विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, गोकुळचे संचालक अजित नरके यांनी मनोगत व्यक्त केले.

दरम्यान संस्थाध्यक्ष ॲड. चव्हाण आत्मलिखित 'शेगाव ते महागाव' पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. सकाळच्या सत्रात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा झाला. कार्यक्रमास डॉ. यशवंत चव्हाण, सचिव ॲड. बाळासाहेब चव्हाण, प्रा. व्ही. एम. पाटील, डॉ. व्हि. वाय. कदम, डॉ. डी. जी. चिघळीकर, डॉ. डी. व्ही. ताम्हणकर, विद्यापिठ कार्यक्षेत्रातील प्राचार्य, शिक्षक उपस्थित होते. शेवटी प्रा. एस. बी. पोवार यांनी आभार मानले.